आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१३ फेब्रुवारी २०२५ गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची सांगता
- आयकर कायदा सोपा करणारं नवीन आयकर विधेयक लोकसभेत सादर
- वाळू माफियांवर मकोका लावण्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे संकेत

**आणि**

- ६५ वर्षांवरच्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना निवृत्ती सन्मान योजनेंतर्गत १० हजार रुपये सन्मान निधी दिला जाणार

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपल्यामुळे संसदेची दोन्ही सभागृह आज येत्या १० मार्च पर्यंत स्थगित करण्यात आली. गेल्या महिन्यात ३१ जानेवारी रोजी अधिवेशनाचा पहिला टप्पा सुरू झाला होता. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात ११२ टक्के उत्पादकता नोंदवली गेल्याचं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. राष्ट्रपतींनी संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला दिलेल्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत १७७ सदस्यांनी १७ तासांहून अधिक काळ भाग घेतला, तर २०२५-२६ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पावरच्या चर्चेत १७० सदस्यांनी भाग घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

वक्फ (दुरुस्ती) विधेयक 2024 बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांच्या गदारोळात सादर करण्यात

आला. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी हा अहवाल सभागृहात मांडला. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी गोंधळ घातला. विरोधी पक्ष सदस्यांच्या मागणीनुसार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अहवालात असहमतीच्या सूचना जोडण्याची परवानगी दिली, तर त्याला भाजपाची कोणतीही हरकत नसल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. त्यानंतर काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी अहवाला विरोधात निषेध नोंदवत सभात्याग केला. राज्यसभेत आज सकाळी कामकाज सुरु झाल्यावर भाजपा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी अहवालाची प्रत सभागृहात मांडली. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी गोंधळ घातला. राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना कारवाईचा इशारा दिला. अहवालामधून असहमती अथवा सूचनांचा कोणताही भाग वगळण्यात आला नसल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केल्याचं ते म्हणाले.

तहकुबीनंतर सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, समितीच्या बैठकीत विरोधी सदस्यांनी दिलेल्या असहमतीच्या नोंदी अहवालात समाविष्ट केल्या नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. हे लोकशाही विरोधी पाऊल असल्याचा आरोप त्यांनी केला, आणि अहवालात मतभेद समाविष्ट नसतील तर तो समितीकडे परत पाठवावा, असं ते म्हणाले.

त्याला उत्तर देताना, विरोधकांनी या मुद्द्यावरून सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केला.

अहवालाचा कोणताही भाग, कार्यवाही अथवा असहमती सूचना हटवण्यात आल्या नसल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवीन आयकर विधेयक लोकसभेत मांडलं. विद्यमान आयकर कायदा सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी हे नवीन विधेयक सरकारनं सादर केलं आहे. हे विधेयक संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्याची शिफारस सीतारामन यांनी केली. आगामी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी समितीनं अहवाल सादर करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड....**

नव्या आयकर विधेयकात धोरणात्तम बदल किंवा करांच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात बदल नाहीत. महत्त्वाचं म्हणजे यातून मागील वर्ष, assessment year हे उल्लेख काढून टाकले आहेत. वेतनाच्या संदर्भातल्या सर्व तरतुदी एकाच ठिकाणी घेतलेल्या आहेत. ग्रॅच्युईटी, कपात, निवृत्तीवेतन वगैरेंचा समावेशही वेतनासोबतच आहे. या विधेयकात जुन्या कायद्याच्या तुलनेत २३ परिच्छेद आणि २८३ कलमं कमी आहेत. कायदा लोकांना अधिक सोप्या पद्धतीनं समजावा यासाठी आधीच्या तुलनेत जास्त तक्ते आणि समीकरणं आहेत. TDS/TCS सुलभ होण्यासाठी यासंदर्भातल्या तरतुदी तक्त्यांच्या स्वरुपात दिल्या आहेत. शिवाय स्वयंसेवी संस्थांसाठीच्या तरतुदी सोप्या भाषेत लिहिल्या आहेत. विधेयक तयार करताना सरकारला २१ हजार सूचना प्राप्त झाल्या. त्यातल्या योग्य सूचनांचा समावेश केल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या.

**<><><><><>**

जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेलं जलयुक्त शिवार हे महत्वाकांक्षी अभियान असून लोकसहभागातून झालेली कामं जलक्रांतीच्या दिशेनं पडलेलं पाऊल असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. जलसंधारण विभागाअंतर्गत ६०१ नवनियुक्त

अधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रांचं ऑनलाईन पध्दतीनं वितरण करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. प्रातिनिधीक स्वरुपात ६ उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती पत्रांचं वितरण मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात झालेल्या समारंभात करण्यात आलं. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

वाळू माफियांना रोखण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून त्यांच्यावर मकोका लावणे, हद्दपार करणे अश्या कडक कारवाया करण्यात येणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते आज अकोल्यात भाजपच्या विभागीय मेळाव्यादरम्यान बोलत होते. कडक कायदे असणारं नवं वाळू धोरण लवकरचं जाहीर करण्यात येणार असल्याचही ते म्हणाले. ज्या नेत्यांना जनतेत जाऊन काम करता येत नाहीत ते ईव्हीएम मशीनवर ठपके ठेवत असल्याचा आरोप विरोधकांवर करताना महायुतीत कुठलीही नाराजी नसल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या काळावर अवैध वाळू उपसा करणाऱ्या दोन ट्रकवर तहसीलदारांनी कारवाई केली आहे. पवनी तालुक्यातल्या कातखेडा घाटावर तहसीलदारांनी काल रात्री धाड टाकली. तेव्हा वाळूचोरी होत असल्याचं उघडकीला आलं. या प्रकरणी दोन ट्रक ताब्यात घेण्यात आले असून वाळूचोरावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

६५ वर्षांवरच्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना निवृत्ती सन्मान योजनेंतर्गत प्रत्येकी १० हजार रुपये सन्मान निधी दिला जाणार आहे. धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि टॅक्सीचालक कल्याणकारी मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातल्या असंघटित क्षेत्रातल्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना सामाजिक योजनांचा लाभ पुरवण्यासाठी या महामंडळाची स्थापना झाल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. त्यासाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना या महामंडळात नोंदणी करावी लागणार आहे. याखेरीज महामंडळाच्या सभासद चालकांना आयुर्विमा, अपघात विमा अशा योजना राबवण्याचे प्रस्ताव विचाराधीन आहेत.

**<><><><>**

माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.  काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव के सी वेणुगोपाल यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. तर विजय वडेट्टीवार यांची काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><>**

रेडिओ हा माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाचा विश्वासू स्त्रोत असल्याचं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी म्हटलं आहे. ते आज जागतिक रेडिओ दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित केलेल्या रेडिओ महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोल होते. आकाशवाणी ही जगातली सर्वात मोठी प्रसारण संस्था असून ही देशाच्या ९८ टक्के लोकांपर्यंत पोहचत आहे.

आकाशवाणीने सर्वसामान्य श्रोत्यांमध्ये हवामान बदलाविषयी जागृकता निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल यांनी यावेळी सांगितलं. लोकांचा आकाशवाणीच्या बातम्या आणि कार्यक्रमातल्या माहितीवर विश्वास आहे असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार राजन साळवी यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित होते. ज्या पक्षातून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली, त्या पक्षाला सोडून जाताना दुःख होत असल्याचं मनोगत यावेळी राजन साळवी यांनी व्यक्त केलं. २०१४ मध्ये युतीचं सरकार आल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आपलं नाव मंत्रिपदासाठी सुचवलं होतं, मात्र विनायक राऊत यांच्यामुळे ती संधी गेल्याचा आरोप साळवी यांनी केला.

दरम्यान, पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं रत्नागिरी जिल्हा समन्वयक रवी डोळस यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची एनईएफटी आणि आरटीजीएस ऑनलाइन प्रणाली हॅक करून सायबर चोरट्यांनी ३ कोटी ७० लाख ६४ हजार ७४२ रुपये लंपास केले आहेत. बँक व्यवस्थापकांनी याची तक्रार पोलिसांच्या सायबर गुन्हे विभागाकडे केली आहे. पोलिसांनी यावर तातडीनं कारवाई करत ३३ खाती गोठविली असून यातून प्रत्यक्ष ६० लाख रुपये बँकेला परत आले आहेत तर अन्य बँकांमधील ७१ लाख थांबवण्यात आले

असल्याने बँकेला आतापर्यंत १ कोटी ३२ लाख रुपये परत मिळवून देण्यात यश आले आहे. ही बँक एका शासकीय बँकेशी लिंकअप असून त्याद्वारे ऑनलाइन व्यवहार केले जातात. सर्व रक्कम हरियाणा इथं बँक खात्यावर वळती झाल्याचं तपासात समोर आलं आहे.

**<><><><><>**

राज्य शासनाने विधवा हा शब्द हटवून त्या ऐवजी ‘पूर्णांगिनी’ हा शब्द वापरावा अशी शिफारस राज्य महिला आयोगाने केली आहे. आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं ही माहिती दिली. महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महिला अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. आपल्या पदावर काम करतांना सोबतच्या महिलांना जागरुक करण्याचं आवाहन करत, समाजाची मानसिकता बदलण्याची आवश्यकता चाकणकर यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचं काल रात्री प्रदीर्घ आजारानं मुंबई इथं त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. ‘बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल’, ‘मर्मबंधातली ठेव, नभ मेघांनी आक्रमिले’, ‘वक्रतुंड महाकाय’ ही त्यांची काही गाजलेली गीतं. त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनसाठी संगीताचे अनेक कार्यक्रम केले. ऍर्निट कोलेमन आणि सुलतान खान यांच्याबरोबर त्यांनी केलेला फ्युजन अल्बमही लोकप्रिय झाला. त्यांच्या संगीत कारकिर्दीच्या सन्मानार्थ त्यांना तानसेन सन्मान , संगीत नाटक

अकादमी, लता मंगेशकर पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

**//<><><><><>//**